स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/१९६ दि. १०/०८/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पिंपरी–चिंचवड परिसर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रमास रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी सहभागी होणेबाबत...

संदर्भ : मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी–चिचंवड, पुणे यांचे दि. ०५/०८/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी–चिचंवड, पुणे यांच्या पत्रानुसार राज्यामध्ये अवैध अंमली पदार्थांच्या वापराचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यास प्रभावी आळा घालण्यासाठी तसेच Drug Free Campus ही संकल्पना राबविण्यासाठी केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनामार्फत अंमली पदार्थांच्या गैरवापर व अवैध तस्करीविरूध्द शून्य सहनशीलता धोरण (Zero Tolerance Policy) स्वीकारण्यात आले असून, अंमली पदार्थांचे उत्पादन, वाहतूक, साठवणूक, विक्री, तस्करी व सेवन यांच्याविरूध्द कठोर कायदेशीर कारवाईबरोबर प्रतिबंधात्मक व जनजागृतीपर उपाययोजनांवर विशेषभर देण्यात येत आहे. अंमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यातून विद्यार्थी व युवक वर्गाला सुरक्षित ठेवण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये सातत्यपूर्ण जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने पिंपरी–चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी, ‘अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम’ आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास मा. पोलीस आयुक्त, पिंपरी–चिंचवड हे मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या व्यसनाधीनतेस प्रतिबंध करणे, शैक्षणिक संस्थांची भूमिका बळकट करणे तसेच अंमली पदार्थांविषयी जनजागृती निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना ‘अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रमाकरिता’ दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी, स. ११ ते ०१ यावेळेत श्री बालाजी युनिव्हर्सिटी, ताथवडे, पिंपरी–चिंचवड याठिकाणी उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे व सदर कालावधीत त्यांची कर्तव्य रजा मंजूर करावी. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, पुणे
दुरध्वनी क्रमांक ०२०-२७३५०१२०
ईमेल आयडी dcpcrime-pcpc-mh@gov.in

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 238
दिनांक: 06 AUG 2026
राष्ट्रीय सेवा योजना

जा.क्र./पोउआ/ ४८४ /२०२६, पिंपरी चिंचवड, दि. ०५/०८/२०२६

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 06 AUG 2026
आवक क्रमांक व्हीसी 4485
जावक दिनांक 06 AUG 2026

प्रति,
मा. कुलगुरू,
पुणे विद्यापीठ

**विषय : अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत....**

महोदय,

राज्यामध्ये अवैध अंमली पदार्थांच्या वापराचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यास प्रभावी आळा घालण्यासाठी तसेच Drug Free Campus ही संकल्पना राबविण्यासाठी केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनामार्फत 'अंमली पदार्थांच्या गैरवापर व अवैध तस्करीविरुद्ध शून्य सहनशीलता धोरण (Zero Tolerance Policy)' स्वीकारण्यात आले असून, अंमली पदार्थांचे उत्पादन, वाहतूक, साठवणूक, विक्री, तस्करी व सेवन यांच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाईबरोबरच प्रतिबंधात्मक व जनजागृतीपर उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत आहे.

अंमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यातून विद्यार्थी व युवक वर्गाला सुरक्षित ठेवण्यासाठी शाळा, महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये सातत्यपूर्ण जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १३/०० या वेळेत श्री बालाजी युनिव्हर्सिटी, ताथवडे, पिंपरी-चिंचवड येथे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील शाळा व महाविद्यालयांसाठी 'अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम' आयोजित करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमास मा. पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड हे मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या व्यसनाधीनतेस प्रतिबंध करणे, शैक्षणिक संस्थांची भूमिका बळकट करणे तसेच अंमली पदार्थांविषयी जनजागृती निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

तरी आपल्या अधिपत्याखालील पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व शाळा/विद्यालय/ महाविद्यालयांचे प्राचार्य/मुख्याध्यापक, प्रत्येक शाळा/महाविद्यालयातून एक शिक्षक प्रतिनिधी तसेच राष्ट्रीय सेवा योजना (NSS/NCC) कार्यक्रम शिक्षक यांनी सदर कार्यक्रमास अनिवार्यपणे उपस्थित राहणेबाबत संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

**मा. पोलीस आयुक्त, यांचे मान्यतेने**

D/K BSD
EIA NSS

Urgent

आपला विश्वासू,

(पोलीस उप आयुक्त गुन्हे)
पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय

No. CM/VIP/D.O./519/2026


देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र


सत्यमेव जयते

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

3 0 JUL 2026

प्रति,

श्री/श्रीमती................

(राज्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य

आणि शाळांचे मुख्याध्यापक)

**सस्नेह नमस्कार,**

आज एका विशेष प्रयोजनानिमित्त आपल्याशी हा पत्ररुपी संवाद साधताना मला अतिशय आनंद होतो आहे.

१५ ऑगस्ट, आपला स्वातंत्र्यदिन आता लवकरच येतो आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आपण राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊ, स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या सर्वांना अभिवादन करु. पण, त्यापेक्षाही मोठी जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, ती म्हणजे हे स्वातंत्र्य टिकवण्याचे, ते अधिक समृद्ध करण्याचे, विकसित भारताच्या वाटेवर असताना आपल्या देशाला, आपल्या राज्याला अधिक शक्तिशाली करण्याचे....

आज देशाला भेडसावणारी सर्वांत मोठी समस्या आहे ड्रग्जची. या धोक्यापासून आपल्या तरुणाईला वाचवणे, दूर ठेवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. त्यातूनच उद्याची बलशाली पिढी आपण निर्माण करु शकू. महाराष्ट्र सरकारने संपूर्ण राज्य व्यसनमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. राज्यात अँटी नार्कोटिक्स टास्कफोर्स गठीत करण्यात आला आहे. सातत्याने विविध अभियान राबविण्यात येत आहेत. पण, ही लढाई एकट्या सरकारची नाही, त्यात आपल्याही सर्वांचा सहभाग अत्यंत मोलाचा ठरणार आहे.

शाळा, महाविद्यालये ही ड्रग्जपासून परावृत्त करण्याची पहिली पायरी असू शकते. म्हणूनच आपल्यासारख्या गुरुजनांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालक अशी एक साखळी तयार झाली, तर ही लढाई आपण अधिक वेगाने जिंकू शकू, याची मला खात्री आहे, म्हणूनच हा पत्रप्रपंच.

काही छोट्या-छोट्या गोष्टी मला आपल्यापुढे विनम्रपणे सूचवाव्या वाटतात.

१) **स्वातंत्र्यदिनी प्रार्थना** : १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणानंतर सर्व विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी 'व्यसनमुक्त विद्यार्थी-व्यसनमुक्त महाराष्ट्र' ही प्रतिज्ञा घेतील.

२) **अंमली पदार्थ प्रतिबंधक समिती** : प्रत्येक संस्थेत अशी समिती गठीत करुन त्यात वरिष्ठ शिक्षक, पालक आणि विद्यार्थी प्रतिनिधी नेमून त्याच्या नियमित बैठका व्हाव्यात.

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

३) **सतर्कता :** आपल्या शैक्षणिक परिसरात पानटपऱ्या, वसतीगृहे, कँटिन अशा संवेदनशील ठिकाणी लक्ष ठेवावे. कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तत्काळ स्थानिक पोलिस अथवा अँटी नार्कोटिक्स टास्कफोर्सला त्याची माहिती द्यावी. त्याची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवण्यात येईल.

४) **कलंक नव्हे संवेदनशीलता :** एखादा विद्यार्थी व्यसनाच्या विळख्यात सापडला असेल तर त्याला पीडित मानून त्याला आवश्यक ती सर्व मदत पुरवणे. समुपदेशन, पालकांशी संवाद यातून त्याला बाहेर काढणे. लक्षात ठेवा आपला कायदा अंमली पदार्थांच्या तस्करांविरोधात कठोर आहे, पीडितेबाबत नाही. त्याला उद्याचा सुजाण नागरिक घडवणे, हाच प्रयत्न असला पाहिजे.

५) **स्वयंसेवक विद्यार्थी :** शाळा, महाविद्यालयांमध्ये आपण एनएसएस, एनसीसी, स्काऊट अँड गाईड असे अनेक उपक्रम राबवितो. त्या सर्व उपक्रमातून नशामुक्ती जनजागृती मोहीमा प्रभावीपणे राबवाव्या. एखाद्या व्याख्यानापेक्षा हा उपक्रम अधिक प्रभावी ठरेल.

६) **पोलिस समन्वय :** स्थानिक पोलिस ठाणे, अँटी नार्कोटिक्स टास्कफोर्स यांना शैक्षणिक संस्थांशी सातत्याने संपर्कात राहून मदत करण्याचे, ११२ या हेल्पलाईनवर प्राप्त होणाऱ्या तक्रारीला तत्काळ प्रतिसाद देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यांना आणखी प्रभावीपणे कामकाज करता यावे, यासाठी सहकार्य करावे.

शेवटी आपल्या भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणे, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. मला खात्री आहे, या महायज्ञात आपणही आपले योगदान निश्चितपणे द्याल. आपली पुढची पिढी बलवान, निरोगी असेल तर भारताला विकसित राष्ट्र बनण्यापासून कोणतीही शक्ती रोखू शकत नाही.

आपल्या सर्वांना पुन्हा एकदा मन:पूर्वक शुभेच्छा!

**जय हिंद, जय महाराष्ट्र!**

आपलाच,

**(देवेंद्र फडणवीस)**

(सोबत: १५ ऑगस्ट रोजी घ्यावयाची प्रतिज्ञा जोडली आहे.)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in

# प्रतिज्ञा

(व्यसनमुक्त विद्यार्थी - व्यसनमुक्त महाराष्ट्र)

आम्ही, या राष्ट्राचे विद्यार्थी आणि युवा, आज गंभीरपणे अमली पदार्थमुक्त जीवन जगण्याची शपथ घेतो.

आम्ही स्वतःला, आपल्या कुटुंबाला आणि आपल्या मित्र-मैत्रिणींना कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर ठेवण्याचे वचन देतो.

आमच्या परिसरात अमली पदार्थांचा वापर किंवा त्यांची विक्री आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही.

अमली पदार्थमुक्त, सुरक्षित आणि निरोगी शैक्षणिक परिसर उभारण्यासाठी आम्ही आमच्या क्षमतेनुसार सर्वतोपरी प्रयत्न करू आणि अमली पदार्थमुक्त भारत घडविण्यासाठी सक्रिय योगदान देऊ.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!**

No. CM/VIP/D.O./519/2026

सत्यमेव जयते

**Devendra Fadnavis**
**Chief Minister**
Maharashtra

30 JUL 2026

**Mantralaya, Mumbai 400 032**

**To,**

**Shri/Smt. .................**

(Principals of all Colleges and Headmasters/
Headmistresses of Schools across the State)

**Warm greetings,**

Today I am happy to write through this letter on a special occasion.

15th August, our Independence Day, is approaching soon. As every year, this year too we will salute the national flag and pay tribute to all those who sacrificed their lives for freedom. But an even greater responsibility lies with all of us — to preserve this freedom, to enrich it further, and to make our country and our state stronger as we move along the path of a developed India.

The biggest problem confronting the country today is that of drugs. It is the duty of all of us to protect our youth from this danger and keep them away from it. Only then can we build a strong generation for tomorrow. The Government of Maharashtra has resolved to make the entire state free of addiction. An Anti-Narcotics Task Force has been constituted in the state, and various campaigns are being continuously conducted. However, this battle is not the government's alone — the participation of all of you will prove extremely valuable in it.

Schools and colleges can be the first step in steering young people away from drugs. That is why the role of teachers like you is extremely important. I am confident that if a chain is formed among principals, headmasters, teachers, and parents, we can win this battle much faster — hence this letter.

I would like to humbly suggest a few small measures to you:

1. **Pledge on Independence Day:** After the flag hoisting on 15th August, all students, teachers, and staff should take the pledge: "Addiction-free students-Addiction-free Maharashtra."

2. **Narcotics Prevention Committee:** Each institution should form such a committee comprising senior teachers, parents, and student representatives, and hold its meetings regularly.

Devendra Fadnavis
Chief Minister
Maharashtra

सत्यमेव जयते

Mantralaya, Mumbai 400 032

3. **Vigilance:** Keep watch over sensitive locations in and around the educational premises, such as paan shops, hostels, and canteens. If anything suspicious is noticed, inform the local police or the Anti-Narcotics Task Force immediately. The identity of the informant will be kept completely confidential.

4. **Sensitivity, not stigma:** If a student is found caught in the grip of addiction, treat them as a victim and provide them with all necessary help. Bring them out of it through counselling and dialogue with parents. Remember, our law is strict against drug traffickers, not against the victim. The effort should be to mould them into a responsible citizen of tomorrow.

5. **Student volunteers:** Schools and colleges run many initiatives such as NSS, NCC, and Scouts & Guides. Anti-drug awareness campaigns should be conducted effectively through all these activities. Such initiatives will be far more effective than a lecture.

6. **Coordination with police:** Local police stations and the Anti-Narcotics Task Force have been directed to stay in continuous contact with educational institutions to assist them, and to respond promptly to complaints received on the 112 helpline. Please extend cooperation so that they can work even more effectively.

Finally, securing the future of our coming generations is our collective responsibility. I am confident that you too will surely contribute to this great endeavour. If our next generation is strong and healthy, no force can stop India from becoming a developed nation.

Once again, heartfelt wishes to all of you!

**Jai Hind, Jai Maharashtra!**

Yours,

**(Devendra Fadnavis)**

(Enclosed: The pledge to be administered on 15th August.)

Tel. : 022-2202 5151/2202 5222, E-mail : cm@maharashtra.gov.in,
Website : www.maharashtra.gov.in